# “पॅट”ची अनुभवसिध्द प्रभावी आयुर्वेदिक औषधे

- **आपोगॅब टॅब्लेट्स:** - आमांश,पोटांत गॅसेस व बध्दकोष्ठ.
- **कॅल्सिपॅट - एफ टॅब्लेट्स:** - रक्तांतील लोहतत्व वाढविते व हाडाना बळकटी देते.
- **फ्लूमल टॅब्लेट्स:** - मलेरिया व फ्लू च्या तापामध्ये उपयोगी.
- **हेमोपॅट टॅब्लेट्स:** - रक्त शुध्द करते व रक्तातील लोहाचे प्रमाण वाढविते.
- **लॅक्सोपॅट (स्ट्राँग) टॅब्लेट्स:** - जुनाट व तीव्र बध्दकोष्ठामध्ये अत्यंत प्रभावी.
- **मधुपॅट (रेग्युलर) टॅब्लेट्स:** - सौम्य मधुमेहामध्ये (प्रमेह) उपयोगी.
- **मेदोपॅट टॅब्लेट्स:** - मेदोरोग व स्थौल्यामध्ये उपयोगी.
- **मायोपॅट टॅब्लेट्स:** - ह्रदयविकारामध्ये उपयोगी.
- **मस्फ्रोज टॅब्लेट्स:** - आमवात,सांधेदुखी यांवर उपयोगी .
- **नर्व्होपॅट टॅब्लेट्स:** - बुध्दिमत्ता,स्मरणशक्ती व मानसिक सहनशक्ति यांचा दर्जा राखण्यासाठी.
- **सेप्टीपॅट-२५० टॅब्लेट्स:** - प्राथमिक जंतु संसर्गामध्ये उपयोगी.
- **सितोपॅट- एस् टॅब्लेट्स:** - तीव्र व जुनाट खोकल्यासाठी,ब्रॉंकायटीस मध्ये उपयोगी.
- **लॅक्टोपॅट टॅब्लेट्स:** - बाळंतपणामध्ये स्तन्यवर्धक व दुग्धवर्धक
- **पायरोपॅट टॅब्लेट्स:** - अंगातील कडकी,बारीक ताप व शरिरांत मुरलेला ताप यांवर उपयोगी
- **पॅट कफ टॅब्लेट्स:** - सर्दी, घशाची खवखव,खोकल्याची उबळ - ढास यामध्ये उपयोगी, गायक,वक्ते,शिक्षक व फिरते विक्रेते यांना उपयोगी.
- **युरोपॅट टॅब्लेट्स:** - मूत्रदाह,मूतखडा (मूत्राश्मरी) यामध्ये उपयोगी.

इ. स. १९७९ पासून आयुर्वेदाच्या सेवेत!

PAT


## पॅट फार्मास्युटिकल्स प्रा.लि.

यशोमंगल,जुन्या पोस्टाजवळ, डॉ.पटवर्धन रोड,
पनवेल (जि.रायगड)४१०२०६.
ग्राहक संपर्क क्रमांक:- ०२२ - २७४५६०३९

E mail : patpharmapvtltd@gmail.com    **Website : www.patpharma.in**


(फक्त आयुर्वेदिक / मेडीकल स्टोअर्स / वैद्यकीय व्यावसायिकांसाठी प्रकाशित)

PAT

# हेमोपॅट
## टॅब्लेट्स



रक्त शुध्द करते व शरिरांतील लोहतत्व वाढविते.
चेहऱ्यावरील मुरूमे,पुटकुळ्या कमी करते.



नैसर्गिकरित्या कांती उजळ करते.



अंगाला खाज येणे, शरिरावरील पुटकुळ्या-फोड कमी करते.

निरंतर निरामय आरोग्याचा महामंत्र :-
संतुलन व संवर्धन करा
रोगप्रतिकारशक्ती, सौंदर्य, बुध्दी, मनसंतुलन व शक्ती ।
“पॅट”ची औषधे देतील निरंतर निरामय आरोग्याची प्राप्ती ।।

||श्रीगणेशाय नमः||　　||श्रीधन्वन्तरये नमः||　　||श्रीकरंजेश्वरी नमः||　　||श्रीव्याडेश्वराय नमः||

# हेमोपॅट टॅब्लेट्स

➢ **घटकद्रव्ये:** मंडूरभस्म, सुवर्णमाक्षिक भस्म, अनंतमूळ, मंजिष्ठ, गुळवेल, हिरडा, निशोत्तर, दारूहळद.

| अ.क्र. | वनस्पतीचे नाव | रस | वीर्य | विपाक | गुण प्रभाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | मंडूरभस्म | - | - | - | - |
| २ | सुवर्णमाक्षिक भस्म | - | - | - | - |
| ३ | अनंतमूळ | मधुर, तिक्त | शीत | मधुर | गुरु, स्निग्ध |
| ४ | हरडे | पंचरस, कषाय प्रधान , लवण वार्ज्यि | उष्ण | मधुर | त्रिदोष हर,रसायन, चक्षुष्य, अनुलोमन, लेखन |
| ५ | निशोत्तर | कटु, तिक्त ,मधुर कषाय | उष्ण | कटु | लघु, रूक्ष, तीक्ष्ण |
| ६ | मंजिष्ठ | मधुर, तिक्त | उष्ण | कटु | गुरु, रूक्ष |
| ७ | गुळवेल | तिक्त, कषाय | उष्ण | मधुर | गुरु, स्निग्ध |
| ८ | दारूहळद | तिक्त, कषाय | उष्ण | कटु | लघु, रूक्ष |

➢ **रोगाची सामाजिक स्थिती:** आपल्या देशातील अर्ध्याहून अधिक स्त्रियांमधे रक्तातील हेमोग्लोबिनचे प्रमाण कमी असण्याचा त्रास आहे. हेमोग्लोबिन ह्या रक्तघटकामुळे रक्ताला लाल रंग प्राप्त होतो. याशिवाय श्वसनाद्वारे घेतलेला ऑक्सिजन संपूर्ण शरीरात पोचवण्याचे अत्यंत महत्त्वाचे काम ह्याद्वारे होत असते. गरोदरपणात व डिलीव्हरीच्या वेळेस कमी हेमोग्लोबिनमुळे अडचणी निर्माण होण्याची शक्यता असते. याशिवाय हेमोग्लोबिन कमी असल्यास चक्कर येणे, हातापायाला मुंग्या येणे, दम लागणे, थकवा येणे आदी अडचणींचा सामना करावा लागतो. केवळ एवढेच नव्हे तर रक्त अशुद्ध असल्यानेही अश्या अडचणी उद्भवतात. आपल्या देशातील समाजव्यवस्थेमधे आजही काही भागात स्त्रियांना दुय्यम दर्जाचे जेवण दिले जाते. गार झालेले, शिळे व कमी प्रमाणात अन्न खाल्ल्याने शरीराला आवश्यक त्या घटकांचा पुरवठा होत नाही व त्यातूनच शरीराचे योग्य पोषण न होणे, रक्ताची कमतरता निर्माण होणे आदी लक्षणे निर्माण होतात.रक्त अशूद्ध असल्यास शरीराला खाज येणे, चेहऱ्यावर डाग पडणे, पिंपल्स, डोळ्याखाली काळी वर्तुळे येणे,स्त्रियांमधे मासिक पाळीच्या वेळी होणाऱ्या काही तक्रारी अश्या समस्या उद्भवतात. हया सगळ्या अडचणी वेगवेगळ्या वाटत असल्या तरी यांचे मूळ मात्र एकच आहे आणि ते म्हणजे रक्तातील अशुद्धी होय. तिखट, तेलकट,आंबवलेले पदार्थ जास्त प्रमाणात खाणे, नॉनव्हेज अतिप्रमाणात खाणे, उन्हात त्वचेची काळजी न घेता फिरणे यामुळे अशा तक्रारी डोके वर काढतात. विशेषकरून आजचे तरूण-तरूणी त्वचेवरचे पिंपल्स, डोळ्याखालची काळी वर्तुळे, डाग आदिंबद्दल अधिक जागरूक आहेत. पुरुषांमधे तंबाखू, चूना,गुटखा यांसारख्या पदार्थांच्या आहारी गेलेल्या व्यक्तींमधे सुद्धा रक्त अशुद्ध असण्याची शक्यता अधिक असते. याकरिता वेगवेगळी क्रिम्स् अन् लेप वापरण्याबरोबरच रक्त शुद्ध करण्याकडे अधिक लक्ष दिले पाहिजे.

➢ **रोगाची माहिती:** शरीराला आवश्यक त्या घटकांचा पुरवठा रक्ताद्वारेच केला जातो. प्रत्येक पेशीला तिचे कार्य पार पाडण्यासाठी आवश्यक असणाऱ्या ऊर्जेचे वहन रक्तामधूनच केले जाते. आणि हेच रक्त जर दूषित झाले असेल तर प्राणवायूचा पुरवठा रक्ताद्वारेच होतो, त्याकरीता रक्तातील हेमोग्लोबिनचे प्रमाण योग्य असणे आवश्यक आहे.अन्यथा पेशींना प्राणवायूचा पुरवठा न झाल्यास त्या पूर्ण क्षमतेने काम करू शकत नाहीत. मसालेदार, तेलकट पदार्थ उदा. नॉनव्हेज, जास्त प्रमाणात सेवन करणाऱ्या समाजघटकांत रक्तातील उष्णता वाढून त्वचा काळवंडणे, फोड येणे व त्यातून लाल अथवा पिवळा स्त्राव होणे, लघवीला जळजळ होणे, शरीरात उष्णता वाढणे इत्यादी लक्षणे दिसतात.

**हेमोपॅट टॅब्लेट्सचे कार्य:**

➢ रक्तदोषामुळे होणाऱ्या आजारांच्या केवळ लक्षणांना दूर करण्यापेक्षा मूळात रक्तातील दोषांनाच दूर करणे व पुढे होणाऱ्या आजारांना अटकाव करणे हे हेमोपॅट टॅब्लेटचे मुख्य उद्दीष्टआहे. त्याकरीता हेमोपॅट टॅब्लेट मधील अनंतमूळ, मंजिष्ठ, गुळवेल, दारूहळद सारखी द्रव्ये शरिरात तयार होणारे नवीन रक्त हे शुद्ध असेल याची काळजी घेतात. याशिवाय मंडूरभस्म, सुवर्णमाक्षिक भस्म या घटकांमुळे कमी झालेले हेमोग्लोबिन नैसर्गिकरित्या वाढण्यास मदत होते.

**हेमोपॅट टॅब्लेट्सचा डोस व कोर्स :**

➢ १ ते २ गोळ्या जेवणानंतर कोमट पाण्यासह १-३ महिने घेणे. गरजेनुसार वैद्यकीय सल्ला घेणे.

**आहार विहार व पथ्य:**

➢ आहारात तिखट व तेलाचे प्रमाण कमी असावे.नॉनव्हेज, इडली-डोसासारखे आंबवलेले पदार्थ, पापड, लोणचे, शिळे दही, आंबट ताक इत्यादींचा समावेश नसावा. आहारात वरून कच्चे मीठ घेणे टाळावे.खजूर, मनुका, अंजीर, डाळींबासारखी फळे नियमित सेवन करावीत. बीट, गाजर, काकडी, मुळा इ. चा समावेश जेवणात असावा. भरपूर पाणी प्यावे. रात्री जागरण टाळावे, किमान ७ तास झोप घ्यावी व सकाळी फिरावयास जाणे, प्राणायाम करणे इत्यादी करावे.

**पॅकिंग व उपलब्धी:**

➢ ५० टॅब्लेट्स





